दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१३ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २२७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 13 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 227 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एका मुंडेंची एन्ट्री
# मुंडेंची तिसरी लेक वैद्यनाथ बँकेची निवडणूक लढणार

मुंबई (वृत्तसंस्था)-भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या तिसऱ्या कन्या यशश्री मुंडे या राजकीय मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. परळी येथील वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला असून. यामुळे त्यांच्या राजकीय पदार्पणाची जोरदार चर्चा सुरू आहे.वैद्यनाथ बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या अंतिम दिवशी यशश्री यांच्यासह त्यांच्या भगिनी पंकजा मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि इतरांनी मिळून ७१ अर्ज दाखल केले आहेत. यापूर्वी वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांनी एकत्र येऊन बिनविरोध यश मिळवले होते. यंदाही दोघे एकत्र दिसण्याची शक्यता आहे.



यशश्री मुंडे या स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या तिसरी कन्या असून पेशाने वकील आहेत. त्यांनी अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातून एल. एल. एम ही पदव्युत्तर पदवी घेतली आहे. त्यांना कॉर्नेल विद्यापीठाकडून, प्रॉमिसिंग आशियाई विद्यार्थी म्हणून गौरवण्यात आले होते. पंकजा आणि प्रीतम यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले, तर यशश्री यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले. इतकी वर्षे त्या राजकारणापासून काहीशा दूर होत्या. मात्र आता वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीसाठी अर्ज भरला आहे.

दरम्यान, गोपीनाथ मुंडे यांचे नाव राज्यातच नाही तर देशातल्या राजकारणात नावाजलेले आहे. त्यांचा राजकीय वसा घेत पंकजा मुंडे आणि प्रीतम मुंडेंनी राजकारणात स्वत:ला सिद्ध केले. पंकजा मुंडे दोन वेळा विधानसभेवर निवडून आल्या आहेत. तर आता त्या विधान परिषदेच्या आमदार आणि राज्याच्या मंत्री आहेत. तर, प्रीतम मुंडे या दोन वेळा बीड लोकसभा मतदारसंघाच्या खासदार राहिलेल्या आहेत. आता गोपिनाथ मुंडे यांची तिसरी कन्या यशश्री यांनी वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव बँकेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच अर्ज दाखल केला आहे.

### १७ जागांसाठी १० ऑगस्टला मतदान

**वैद्यनाथ बँकेच्या एकूण १७ जागांसाठी निवडणूक होत आहे. १० ऑगस्टला मतदान तर १२ रोजी मतमोजणी होणार आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी माजी खासदार डॉक्टर प्रीतम मुंडे यशस्वी मुंडे या भगिनींसह ७१ अर्ज दाखल झाले. सर्वसाधारण मतदारसंघातील १२ जागांसाठी ५२ अर्ज दाखल झाले आहेत. अनुसूचित जमातीच्या एका जागेसाठी ४ अर्ज, भटक्या विमुक्त जाती-जमाती (विमाप्र) च्या एका जागेसाठी ४ अर्ज, इतर मागासवर्गीय (ओबीसी) साठी एका जागेसाठी ६ अर्ज, आणि महिलांसाठी राखीव दोन जागांसाठी ५ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे निवडणुकीत चुरस वाढण्याची शक्यता आहे. वैद्यनाथ बँकेचे संचालक मंडळ यंदा बिनविरोध निवडले जाणार की निवडणूक होणार, याबाबत उत्सुकता आहे. २९ जुलै दरम्यान अर्ज मागे घेण्याचा कालावधी असून यानंतरच निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.**

## ओवीचे नवोदयनंतर स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश!

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने



घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी व नवोदय पात्रता परीक्षा यामध्ये उल्लेखनीय कामगिरी करत कु. ओवी राहुल उंडाळे हिने आपल्या मेहनतीचा ठसा उमटवला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाघे बाभुळगाव, ता. केज येथील विद्यार्थिनी असलेल्या ओवीने शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ च्या नुकत्याच जाहीर झालेल्या गुणवत्ता यादीत बीड जिल्ह्यात दहावा तर केज तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

नवोदय पात्रता परीक्षेतही यश मिळवणाऱ्या ओवीने पुन्हा एकदा तिच्या अभ्यासातील एकाग्रता, जिद्द व चिकाटी सिद्ध केली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक तसेच पालक वर्गाने तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, भविष्यातही ती अशीच प्रगती करत राहो, अशा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.ओवीचे हे यश केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या कु. ओवी राहुल उंडाळे हिला हार्दिक शुभेच्छा!

**तिने मिळवलेले यश हे तिच्या चिकाटी, अभ्यासूवृत्ती आणि शिस्तीचे प्रतिक आहे. अशा विद्यार्थिनींमुळे केज तालुक्याचा शैक्षणिक स्तर उंचावतो आणि इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळते. भविष्यात ती आणखी यशोशिखर गाठो, हीच सदिच्छा.**

**-श्री.लक्ष्मण बेडसकर**
**गटशिक्षण अधिकारी, केज**

## साळेगाव जवळ कार पलटी अपघातात दोघे जखमी

**केज । गौतम बचुटे**

केज कळंब रस्त्यावर साळेगाव जवळ कार तीन- चार वेळा पलटी होवून झालेल्या अपघातात चालकासह त्यांचे वृद्ध वडील जखमी झाला आहे. या बाबतची माहिती अशी की दि. १२ जुलै, शनिवार रोजी केज तालुक्यातील व्यंकट पंडित लाड हे त्यांच्या कुटुंबासह पुणे येथून त्यांची स्विफ्ट डिझायर कार क्र. (एम एच १४/ जी एच ९६५१) ने त्यांच्या गावाकडे लाडेवडगाव ता. केजकडे जात होते. दुपारी ४:०० सुमारास साळेगाव जवळ मोहरील बाबा दर्या जवळ आले असता चालकाचे नियंत्रण सुटून गाडीने तीन ते चार पलट्या खाल्ल्या. त्या नंतर गाडी खड्यात पलटी झाली. या अपघातात गाडीचा चालक व्यंकट लाड आणि त्यांच्या शेजारी बसलेले त्यांचे वडील पंडित लाड हे जखमी झाले. तसेच मागील सीटवर बसलेले गयाबाई पंडित लाड, प्रतीक्षा राहुल लाड (रा. सर्व लाडेवडगाव) आणि छाया मुंडे (रा. परळी) या किरकोळ जखमी झाल्या आहेत.



या रस्त्याने प्रवास करीत असलेले पत्रकार गौतम बचुटे, त्यांचा भाऊ बलभीम बचुटे, मुलगा रितेश आणि पुतण्या यश आणि जनविकास सेवाभावी संस्थेचे शरद पवार यांनी तात्काळ जखमींना अपघातग्रस्त वाहना बाहेर काढण्यासाठी गाडीचे काच आणि दरवाजे मोडून त्यांना बाहेर काढले. त्या नंतर एका खाजगी वाहनातून त्यांना उपजिल्हा रुग्णालय केज येथे हलविले. दरम्यान अपघाताची माहिती पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना देताच त्यांच्या आदेशाने पोलिस हेडकॉन्स्टेबल बाबासाहेब बांगर, मुंडे, वाहतूक शाखेचे सिद्दिकी हे अपघातस्थळी हजर झाले.

**एक वर्षाची मुलगी सुखरूप :-** अपघात ग्रस्त गाडीत आई प्रतीक्षा मुंडे हिच्या कुशीत असलेली एक वर्ष वयाची कु. परीधी राहुल लाड हिला मात्र साधे खरचटले देखील नाही.

**जखमींना बाहेर काढताना रितेश किरकोळ जखमी :-** अपघातातील जखमींना गाडी बाहेर काढण्यासाठी रितेश गौतम बचुटे याने हाताने काच फोडण्याचा प्रयत्न केला असता त्याच्या हाताला आणि पायाला खरचटून तो किरकोळ जखमी झाला.

## खा.सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित्त शाळेत साहित्य वाटप

**केज । गौतम बचुटे**

बीड जिल्ह्याच्या खासदार बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसा निमित सामाजिक कार्यकर्त्या विमलताई जोगदंड आणि बालासाहेब जोगदंड यांच्या स्पिशेट सेवा भावी संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय साहित्य वाटप करण्यात आले.केज तालुक्यातील सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेले बाळासाहेब जोगदंड सर व त्यांच्या पत्नी विमलताई जोगदंड यांनी खा. बजरंग सोनवणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि दप्तर यांचे वाटप केले.



या कार्यक्रमाचे उद्घाटक खा. बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळाचे तालुकाध्यक्ष शिवाजी चौधरी तर शहराध्यक्ष तथा माजी न.प. नगरसेवक कपिल मस्के व राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शंकर जाधव हे कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि प्रमुख अतिथी म्हणून शरीफ सय्यद, दलिलभाई इनामदार, विमलताई जोगदंड, शितलताई लांडगे, युनुस शेख, बालासाहेब गाढवे, रिपाइंचे सरचिटणीस पत्रकार गौतम बचुटे, पत्रकार प्रदीप गायकवाड, गणेश सावंत, गौसोद्दीन इनामदार यांच्यासह ढाकणे सर, बासर सर, इनामदार सर, वाघमारे सर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संयोजक बाळासाहेब जोगदंड यांनी तर आभार श्रीमती मीरा गायकवाड यांनी आणि सुत्रसंचालन श्रीमती अरुणा सिरसट यांनी केले.

## वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा-आष्टी वकील संघाची मागणी

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महाराष्ट्रा मध्ये वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा,तसेच ज्या वकील बांधवावर जीव घेणा हल्ला झाला अशा वकील बांधवाना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निपक्ष पणे चौकशी करून आरोपीना शिक्षेची तरतूद करावी.या मागणी साठी आष्टी वकील संघाच्या वतीने आष्टी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.या बाबत सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्रा मध्ये वकील बांधवासाठी स्वरक्षण कायदा पारित करण्यात यावा,तसेच ज्या वकील बांधवावर जीव घेणा हल्ला झाला अशा वकील बांधवाना न्याय मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निपक्ष पणे चौकशी करून आरोपीना शिक्षेची तरतूद करावी.महाराष्ट्रा मध्ये वकील बांधवावर हल्ला करण्याचे प्रमाण वाढलेले आहे.त्यामुळे



वकील बांधवाना स्वतंत्र स्वरक्षण कायदा करणे बाबत महाराष्ट्र शासनाने दखल घेऊन त्वरित अमलात आणावा.अशी मागणी वकील संघाच्या वतीने आष्टी तहसीलदार यांना निवेदन देऊन केली आहे.तसेच सन्माननीय आमदार सत्यजित तांबे यांनी विधान परिषद मध्ये वकील स्वरक्षण कायद्या बाबत सडेतोड पणे आवाज उठवला. त्याबद्दल आष्टी वकील संघाच्या वतीने आष्टी वकील संघांचे उपाध्यक्ष ऍड किशोर निकाळजे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये ऍड अजिनाथ पोकळे यांनी आमदार सत्यजित तांबे यांचा अभिनंदनचा ठराव मांडला,त्याला ऍड अजय जोशी अनुमोदन दिले.आष्टी वकील संघाच्या वतीने आमदार सत्यजित तांबे यांचा अभिनंदन चा ठराव संमत करण्यात आला.या कार्यक्रमाला आष्टी वकील संघांचे उपाध्यक्ष ऍड किशोर निकाळजे, सचिव ऍड यासिर सय्यद,ऍड.एम. एस. तांदळे,ऍड अविनाश निंबाळकर,ऍड पारखे,ऍड डी.एस. ससाणे,ऍड बाप्पुसाहेब गर्जे,ऍड शेख रियाज,ऍड सतीश गायकवाड, ऍड राजू निकाळजे,ऍड संभाजी दहातोंडे,ऍड उद्धव पोकळे,ऍड धुमाळ,ऍड सचिन चव्हाण,ऍड आबासाहेब आजबे,ऍड डोरले,ऍड विजय ढोबळे,ऍड भोकरे,ऍड चौधरी,ऍड अजीज,ऍड डी.सी.शेख इत्यादी विधिज्ञ उपस्थित होते.



**मा.बालाजी जगतकर**
यांची दैनिक वादळवार्ताच्या कार्यकारी संपादक पदी नियुक्ती करण्यातआली आहे.त्यांना पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा
संपादक,दैनिक वादळवार्ता

## ठाकर आडगावचा राजवीर देशपातळीवर झळकला

**जातेगांव । प्रतिनिधी**

शिक्षणासाठी ग्रामीण भागातील संघर्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मेहनतीच्या जोरावर मोठ्या पदापर्यंत पोहोचण्याचे उदाहरण पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. गेवराई तालुक्यातील ठाकर आडगाव सारख्या छोट्या गावातील शेतकरी कुटुंबातील चि. राजवीर भारत कोकाट याने देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या जेईई(जॉइंट एन्ट्रन्स एक्झामिनेशन) या परीक्षेत देशातून थेट ३२ वा क्रमांक मिळवत आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटवला आहे.

राजवीरचं हे यश संपूर्ण तालुक्यासाठी, जिल्ह्यासाठी आणि विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. अत्यंत साध्या आणि शेतकरी पार्श्वभूमीतील घरातून येणाऱ्या राजवीरने अपार मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर हे यश प्राप्त केलं आहे. त्याच्या या घवघवीत यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.या यशाबद्दल मराठा संघर्षयोध्दा मा. मनोज जरांगे पाटील यांनी स्वतः पुढाकार घेऊन राजवीरचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार केला. त्याचबरोबर पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा देत, मराठा समाजातील विद्यार्थ्यांनी अशा प्रकारे पुढे येणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.सत्कार समारंभप्रसंगी मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष सुरेश ढास सर, वडील भारत कोकाट, तसेच कुटुंबातील सदस्य, ग्रामस्थ व शाळेतील शिक्षकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. राजवीरच्या यशाने फक्त गावाचेच नाही तर संपूर्ण मराठवाड्याचे नाव उज्वल केले आहे.राजवीरने मिळवलेले यश ही केवळ वैयक्तिक कर्तृत्वाची झलक नसून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला बळकटी देणारा प्रेरणास्रोत आहे. अशाच विद्यार्थ्यांमुळे 'शिकूया, लढूया आणि जिंकूया' हा मंत्र प्रत्यक्षात उतरतो आहे.



संपादकीय

# जिल्हा परिषद शाळांना संजीवनी कोण देणार ?

राज्यात मराठी भाषेला तिसरा पर्याय म्हणून पहिलीपासून हिंदीची सक्ती यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नव्याने कात टाकल्याप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनीदेखील काही प्रमाणात 'बॅकफूट'ला जात सर्वसमावेशक चर्चा करून यावर निर्णय घेण्याचे जाहीर केले. मुळातच मराठी भाषेचा पुळका घेऊन राणा भीमदेवी थाटात उतरलेल्या राजकीय नेतेमंडळींचे मराठी भाषा, मराठी शाळांवरील प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम असल्याचे मागील काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. स्वत:ची मुले इंग्रजी माध्यम, सीबीएसई बोर्ड, दिल्ली बोर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, कॉन्व्हेंट शाळा अशा विविध इंग्रजाळलेल्या शाळांमध्ये घालायची आणि राजकीय व्यासपीठावरून मराठीच्या नावाने टाहो फोडत मराठी भाषिकांची मते मिळवायचा 'फंडा' गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे. मुंबई शहर, उपनगरात तसेच कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर, पनवेल-उरण, बदलापूर, कर्जत-कसाऱ्यापर्यंत मराठी भाषेच्या शाळा गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद पडल्या असून त्या त्या शाळेतील शिक्षकांना 'सरप्लस' व्हावे लागल्याने त्यांना अन्य शाळांची शोधाशोध करण्याची वेळ आली आहे. नोकरी टिकविण्यासाठी सभोवतालच्या परिसरात जाऊन तेथील मुले आपल्या शाळांमध्ये आणण्यासाठी विविध प्रकारचे द्राविडी प्राणायम करावे लागत आहेत.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात शिरकाव होऊ लागल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाधिक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटल्याने तेथील शाळांनाही टाळे लावण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत असून यंदाही ही घसरण कायम राहिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्या त्या ग्रामीण भागातील पालकांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश न देता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य दिल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर हे संकट गडद होत असताना शिक्षण विभाग आणि तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी उदासीन असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांची कमी होणारी पटसंख्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण मोफत असूनही पालक खासगी शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करून शिक्षणाची निवड करत आहेत, यावरून पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत असल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळत आहे. शासन समग्र शिक्षण अभियान, शाळा दत्तक योजना, डिजिटल क्लासरूम अशा योजना जाहीर करते व राबविते. मात्र त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का, हाही प्रश्न आहे. पटसंख्या कमी होण्याचे प्रमाण येत्या काळात असेच कायम राहिले तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्येची होणारी ही घसरण आताच थांबविली नाही तर, भविष्यात ग्रामीण भागातील शिक्षणाची आणखी अधोगती होणार, हे निश्चित आहे.जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समग्र शिक्षा अभियान, शाळा समृद्धी योजना, डिजिटल क्लासरूम यांसारख्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कुठे कमी पडते, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार यावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्येत होणारी घट, ही गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या, सेमी इंग्रजी माध्यमांच्या अथवा सीबीएसई बोर्डाचे अभ्यासक्रम वेळीच सुरू केले असते तर ग्रामीण भागात महागडे शिक्षण देणाऱ्या इंग्रजी शाळांच्या संस्थांना शिरकाव करणेही अवघड झाले असते. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी त्या त्या काळांतील राज्य सरकारच्या शिक्षण मंत्र्यांनी, शिक्षण विभागाने आजतागायत कधीही गांभीर्यांने प्रयत्न केलेच नाहीत. शाळांमध्ये पटसंख्या कायम राहावी किंवा वाढावी यासाठी शिक्षण विभाग व शिक्षकांकडून अपुरे प्रयत्न झाल्याने गावागावातील मुलांचा खासगी शाळांकडे वाढता कल गेल्या काही वर्षांमध्ये राहिला आहे. परिणामी तेथील इंग्रजी माध्यम व सुविधा यामुळे अनेक पालक मुलांना खासगी शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये पाठवू लागले आहेत. काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अनुपलब्धता, साधनसामग्रीची कमतरता हेही कारण आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांना टाळे लागत आल्याने टाहो फोडण्यात आता काहीही अर्थ राहिलेला नाही. स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी अथवा जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आता वरवरची मलमपट्टी नाही तर ठोस उपाययोजनांची गरज आहे. शहरी भागातील मराठी भाषा टिकविण्यासाठी आपल्याला आलेल्या अपयशाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविणे आवश्यक आहे. अनेक गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांना टाळे लागले आहे. हे चित्र सर्व राज्यामध्ये दिसण्यापूर्वीच राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने तसेच सत्ताधाऱ्यांनी, विरोधकांनीही एकत्रित येत प्रयत्न करणे आवश्यक आहे.हिंदी भाषेला पर्यायी भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करताच राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले; परंतु राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना लागत असलेले टाळे व त्या शाळांमधील शिक्षकांवर 'सरप्लस'च्या नावाखाली येऊ घातलेली बेरोजगारीची वेळ याकडे पाहण्यास कोणालाही वेळ नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांचे अस्तित्व न टिकल्यास गोरगरिबांच्या, शेतमजुरांच्या मुलांना आर्थिक गणितांची जुळवाजुळव न झाल्यास शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येणार आहे. सर्वांनाच इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील महागडे शिक्षण परवडणारे नाही. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांनी एकत्रित येणे व गावागावातील ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे; परंतु दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये. या उक्तीप्रमाणे शहरी भागासाठी आपण काही करू शकलो नाही, निदान ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी संघटित होणे काळाची गरज आहे.

# शुभांशूची तिरंगा घेऊन अंतराळात भरारी



आपल्या कुटुंबातील वडील, मुलगा किंवा पती घर सोडून दुसऱ्या शहरात राहायला जातो, तेव्हा कुटुंबातील सदस्यांच्या भावनिकतेला पारावार राहत नाही. त्याचप्रमाणे देशाचा सुपूत्र शुभांशू शुक्ला संशोधनासाठी अंतराळात रवाना झाला. त्याच्या कुटुंबांना जितका अभिमान आहे, तितकाच तो भारतीय असल्याचा गर्व समस्त देशवासीयांना आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रात आज हा एक ऐतिहासिक क्षण मानला जातो. देशभर शुभांशूवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे अंतराळात गेलेले भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी त्यांच्या तीन सहकाऱ्यांबरोबर मिळून 'क्सिऑम-४' या अंतराळ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने बुधवारी दुपारी उड्डाण केले. 'ऑक्सिओम-४'चे हे अंतराळातील चौथे खासगी अभियान आहे. हे नासा आणि स्पेसएक्सचे संयुक्त अभियान आहे. या अंतराळ मोहिमेत चार देशांमधील ४ अंतराळवीरांचा समावेश आहे. भारत, अमेरिका, पोलंड, हंगेरी हे देश आहेत, जे अंतराळवीर या मोहिमेत समाविष्ट आहेत.

नासाच्या फॉल्कन-९ या रॉकेटद्वारे फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांनी अवकाशात झेप घेतली. ४१ वर्षांनंतर भारतीय व्यक्ती अंतराळात गेल्याचा वेगळा आनंद आहे. याआधी ३ एप्रिल १९८४ रोजी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे सोव्हिएत संघाच्या मदतीने अवकाश मोहिमेवर गेले होते. आता वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला अंतराळ मोहिमेवर गेले आहेत. एक वर्षाचे प्रशिक्षण व कठोर मेहनतीनंतर शुक्ला यांची नासाने या मोहिमेसाठी निवड केली आहे. या मोहिमेत अंतराळातील पिकांच्या उगवणीसाठी महत्त्वाचं संशोधन करण्यात येणार आहे. त्यामुळे भारत केंद्रित अंतराळ शेती आणि भविष्यातील अंतराळ संशोधनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. या मोहिमेसाठी ५४८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणाऱ्या शुभांशू शुक्ला यांना लढाऊ विमान उडवण्याचा अनुभव आहे. या मिशनमध्ये ते मिशन कमांडर असणार आहेत. चाळीस वर्षीय शुभांशू यांचा जन्म लखनऊमध्ये झाला. जून २००६ मध्ये ते भारतीय हवाईदलात दाखल झाले. मार्च २०२४ मध्ये ते ग्रुप कॅप्टन बनले. एक दुर्मीळ योगायोग असा की, राकेश शर्मा यांच्या मोहिमेला ४१ वर्षे झाली आहेत; परंतु ४० वर्षांचे शुभांशू हे राकेश शर्मांनंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय ठरले आहेत. शुभांशू शुक्ला यांनी सु-३०, मिग-२१, मिग-२९, जगुआर, हॉक, डोर्नियर आणि एएन-३२ सह विविध विमानांवर २ हजारांपेक्षा अधिक तास उड्डाण केले आहे. २०१९ मध्ये त्यांनी रशियाच्या गगारिन कॉस्मोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये अंतराळ यात्री म्हणून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर भारताच्या गगनयान मिशनसाठी त्यांची इस्रोकडून निवड झाली होती.

मोदी-बायडेन करारातून जन्मलेली मोहीम आहे. या मोहिमेची घोषणा जून २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिकेतील दौऱ्यात झाली होती. यामध्ये इस्रो आणि नासा यांच्यातील सहकार्याने भारतीय अंतराळवीराला अंतराळात पाठवण्याचा निर्णय झाला होता. या अंतराळ मोहिमेसाठी भारताने एक जागा मिळवण्यासाठी ५५० कोटी रुपये ॲक्सिअम स्पेसला दिले आहेत. हे भारताच्या जागतिक अंतराळ सहकार्याचे प्रतीक आहे. ही मोहीम मिशन आकाशगंगा या नावाने ओळखली जाते. यापूर्वी ॲक्सिओम-४ मोहिमेचे प्रक्षेपण अनेक कारणांमुळे पुढे ढकलण्यात आले होते. पूर्वी निश्चित वेळापत्रकाबद्दल बोलायचे झाले तर ते २९ मे रोजी प्रक्षेपित होणार होते. तथापि, त्यावेळी ते पुढे ढकलण्यात आले आणि नंतर ते ८ जून, १० जून आणि ११ जून रोजी पुढे ढकलावे लागले. अखेर, दीर्घ प्रतीक्षेनंतर, ते २५ जून रोजी प्रक्षेपित करण्यात आले. दोन आठवड्यांच्या या मोहिमेचे नेतृत्व माजी अंतराळवीर पेगी व्हिटसन करत आहेत. या मोहिमेत एकूण ६० वैज्ञानिक प्रयोग करण्यात येणार असून, त्यापैकी ७ प्रयोग भारतातील संशोधकांनी सुचवले आहेत. ज्यात मूग आणि मेथीची लागवड करण्याचा समावेश आहे. पृथ्वीवर करोडो लोकांना त्रस्त करणाऱ्या डायबेटिस अर्थात, मधुमेहावरील उपचारात क्रांती घडवण्यासाठी आता अंतराळाची मदत घेतली जात आहे. ॲक्सिअम-४ मोहिमेतील अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अत्यल्प गुरुत्वाकर्षणाच्या स्थितीत इन्सुलिनवर अभ्यास करणार आहेत. या संशोधनामुळे मधुमेहींसाठी अधिक प्रभावी आणि स्थिर इन्सुलिन तयार करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. पृथ्वीवर इन्सुलिनचे रेणू एकत्र येऊन गुठळ्या तयार होतात, ज्यामुळे त्याची परिणामकारकता कमी होते. इन्सुलिन पंपांसारख्या उपकरणांमध्ये यामुळे अडथळे निर्माण होतात. मात्र, अंतराळातील मायक्रोग्रॅव्हिटीच्या वातावरणात ही प्रक्रिया अत्यंत मंदावते. यामुळे शास्त्रज्ञांना इन्सुलिनच्या रेणूंची गुठळी तयार होण्याच्या प्रक्रियेचे अधिक सखोल विश्लेषण करण्याची संधी मिळणार आहे. या मोहिमेतील अंतराळवीर या प्रक्रियेचा अभ्यास करून असा डेटा गोळा केला जाईल. ज्याच्या मदतीने पृथ्वीवर अधिक स्थिर आणि जास्त काळ टिकणारे इन्सुलिन विकसित करता येईल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. हे संशोधन यशस्वी झाल्यास, ते केवळ इन्सुलिनची परिणामकारकता वाढवणार नाही, तर मधुमेहावरील उपचारांचा खर्च कमी करण्यासही मदत होणार आहे.माझ्याबरोबर, माझ्या खांद्यावर आपला तिरंगा आहे. हा तिरंगा मला सांगतोय की, मी या प्रवासात एकटा नाही. मी तुम्हा सर्वांबरोबर इथे आहे, ही शुभांशू शुक्लाची इन्स्टाग्रामवरची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत असून, शुभांशूच्या देशप्रेमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

# शुभांशूची अभिमानास्पद भरारी



गेल्या दोन-तीन दशकांमध्ये भारताचा अंतराळ कार्यक्रम त्याच्या आर्थिक प्रगतीमुळे ठळकपणे दिसू लागला. अंतराळ तंत्रज्ञानात जास्तीत जास्त स्वयंपूर्णतेची आपली भूमिका राहिली. भारत आपल्या अंतराळ संशोधनाला राष्ट्रीय मानबिंदूंशी जोडतो. भारताने २०२३-२४ मध्ये एकूण ११ कृत्रिम आणि इतर देशांचे नऊ उपग्रह प्रक्षेपित केले. २० उपग्रह एकाच अग्निबाणाने प्रक्षेपित करणारा भारत हा पहिला देश आहे. उपग्रह प्रक्षेपणाखेरीज भारतीय वंशाची महिला अंतराळवीर सुनीता विल्यम्स अंतराळात नऊ महिन्यांहून जास्त कालावधीचा मुक्काम केल्यानंतर पृथ्वीवर परतल्या होत्या. त्यानंतर गेले काही दिवस भारतीय ज्या सुवर्णक्षणाची वाट पाहत होते, तो अवतरला. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आणि इतर तीन अंतराळवीरांना घेऊन एक्सिऑम चार मोहिमेअंतर्गत फाल्कन रॉकेट आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या प्रवासासाठी अवकाशाच्या दिशेने रवाना झाले. या पथकाचे नेतृत्व अनुभवी कमांडर पॅगी व्हिटसन करत असून त्यांच्यासोबत हंगेरीचे टिबोर कपू आणि पोलंडचे स्लोव्होज विस्निव्हस्की हे अन्य तज्ज्ञ अंतराळवीर आहेत. त्यांच्यासह भारतीय हवाई दलाचे पायलट, ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला, आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणाऱ्या क्सिओम मिशन ४ (क्स-४) चा भाग म्हणून स्पेसएक्सच्या ड्रॅगन यानातून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले. ते १४ दिवसांच्या मोहिमेवर अंतराळात गेले आहेत. ते या मोहिमेचे पायलट असून २५ जून २०२५ रोजी १२ वाजून १ मिनिटांनी ड्रॅगन यशस्वी प्रक्षेपित होऊन अंतराळात स्थिरावले आहे.

हे मिशन एक महत्त्वाचा टप्पा आहे कारण, शुभांशू अंतराळात जाणारे दुसरे भारतीय आणि आयएसएसला भेट देणारी पहिली व्यक्ती आहे. क्सिओम मिशन ४ ही आयएसएसची खासगी अंतराळवीर मोहीम आहे. त्यांचे हे उड्डाण देशाच्या अंतराळ इतिहासातील एका नवीन अध्यायाची सुरुवात आहे. या मोहिमेमुळे भारत अवकाशजगात पुन्हा निर्णायक भूमिकेत येईल. या मिशनसाठी इस्रोने अंदाजे ५५० कोटी रुपये खर्च केले असून शुभांशू अंतराळस्थानकात सात स्वतंत्र वैज्ञानिक प्रयोग पार पाडणार आहेत. यामध्ये भारतीय सूक्ष्म गुरुत्व प्रयोग, कडधान्यांच्या अंकुरण प्रक्रियेचा अभ्यास, मानवी पेशींवर गुरुत्वहीनतेचा प्रभाव तसेच भात, टोमॅटो आणि वांग्याच्या बियाण्यांवर गुरुत्वशून्य वातावरणाचा परिणाम यांचा समावेश आहे. शुक्ला हे भारतीय हवाई दलाचे एक सन्मानित चाचणी पायलट आहेत. त्यांना २००० पेक्षा जास्त तासांच्या उड्डाणाचा अनुभव आहे. ते १७ जून २००६ रोजी हवाई दलाच्या लढाऊ क्षेत्रात सामील झाले. त्यांनी सुखोई-३० एमकेआय, मिग-२१, मिग-२९, जग्वार, हॉक, डोर्नियर आणि एन-३२ यांसह विविध विमाने उडवली आहेत. ते आता अंतराळात जाणारे पाचवे भारतीय बनले आहेत. ते गगनयान मोहिमेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रमुख दावेदारांपैकी एक आहेत. १० ऑक्टोबर १९८५ रोजी लखनऊ येथे जन्मलेल्या शुक्लांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकादमीतून पदवी प्राप्त केली तर बंगळूरुच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे एरोस्पेस अभियांत्रिकीमध्ये शिक्षण घेतले. २०१९ मध्ये त्यांनी रशियातील गगारिन कॉस्मोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये अंतराळवीर म्हणून प्रशिक्षण घेतले. १९८४ मध्ये विंग कमांडर राकेश शर्मा यांच्या ऐतिहासिक उड्डाणानंतर ४१ वर्षांनी भारत पुन्हा एकदा एका भारतीयाला मानवयुक्त मोहिमेअंतर्गत अंतराळात पाठवत आहे. या मोहिमेबद्दल शुभांशू शुक्ला अभिमानाने म्हणतात, 'मी राकेश शर्माजींबद्दल शाळेच्या पुस्तकांमध्ये वाचले होते, त्यांच्या अनुभवांमुळे मला प्रेरणा मिळाली. आज मीही त्या मार्गावर आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची आणि जबाबदारीची बाब आहे.' राकेश शर्मा यांनी ३ एप्रिल १९८४ रोजी सोयुझ टी-११ अंतराळयानातून मोहीम पार पाडली होती. ही सोव्हिएत युनियनसोबतची संयुक्त मोहीम होती, ज्यामध्ये राकेश शर्मा अंतराळात जाणारे पहिले भारतीय बनले. आपल्या या आव्हानात्मक मिशनबद्दल आनंद व्यक्त करताना शुभांशू शुक्ला म्हणाले, भारतातील लोकांसोबत आपले अनुभव वाटण्यासाठी मी तयार आहे. देशाच्या विविध भागांमधून सांस्कृतिक वस्तू अंतराळात घेऊन जाण्याची माझी योजना आहे.अंतराळ स्थानकात मला योगमुद्राही करायची आहे. राकेश शर्मा यांच्या अंतराळ सफरीच्या अनेक दशकांनंतर पहिल्यांदाच भारतीय पायलट आयएसएसवर मिशन करत आहे. नासा आणि इस्रोच्या या संयुक्त मोहिमेत अंतराळात संशोधन आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करण्यात येणार आहे. शुभांशू अंतराळातील मानवी आरोग्य आणि जीवांवर होणारा परिणाम याचा अभ्यास करणार आहे. पृथ्वीवरून अंतराळात अन्न पाठवणे खर्चिक आणि कठीण काम असते. त्यामुळे अंतराळात अन्न निर्मितीसाठी या मोहिमेत प्रयोग केले जाणार आहेत. यामध्ये मूग आणि मेथी पिकांवर अभ्यास करण्यात येणार आहे. भारतीय अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्था सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात सहा प्रकारच्या पिकांच्या बियाण्यांची चाचणी घेणार आहे. तसेच पृथ्वीवर परतल्यानंतर त्याच्या आनुवंशिकतेतील बदलांचे निरीक्षण करून भविष्यातील अंतराळ शेतीसाठी सर्वात योग्य गुणधर्म निवडण्यासाठी या बियाण्यांची लागवड करण्यात येणार आहे. या संशोधनामुळे भविष्यात मंगळ आणि चंद्र मोहिमेवर अन्न निर्मितीसाठी क्रांती घडेल, असे तज्ज्ञ सांगतात.पृथ्वीच्या कक्षेत फिरणाऱ्या जुन्या उपग्रहांमुळे, रॉकेटच्या भागांमुळे आणि इतर कचऱ्यामुळे अंतराळातील कचरा वाढत आहे. यामुळे भविष्यात अंतराळ मोहिमा आणि उपग्रहांसाठी धोका निर्माण होऊ शकतो. अंतराळात राहिल्याने मानवी शरीरावर हाडे आणि स्नायू कमजोर होणे, दृष्टी आणि रोगप्रतिकारशक्ती कमी होणे अशा प्रकारचे अनेक नकारात्मक परिणाम होऊ शकतात, अंतराळात अन्न आणि पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी लागते. अंतराळात वातावरणाचा (उदा. किरणोत्सर्ग) मानवी शरीरावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असते. त्यासाठी अंतराळवीरांना अंतराळ स्थानकांवर वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण दिलेले असते. आपले शरीर कमी गुरुत्वाकर्षणाच्या वातावरणासाठी बनलेले नाही. आपले स्नायू, हाडे, हृदय आणि इतर प्रणाली अवकाशात पृथ्वीपेक्षा वेगळ्या पद्धतीने कार्य करतात. त्यामुळे अंतराळात आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. कमी गुरुत्वाकर्षणाच्या दीर्घकालीन परिणामांमध्ये हाडे आणि स्नायूंचे नुकसान होते. अंतराळात गुरुत्वाकर्षणाच्या अभावामुळे हाडांच्या वाढीच्या प्रणाली तुटतात. अंतराळवीर सामान्यतः सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात त्यांच्या शरीराला आधार देण्यासाठी काही स्नायू गटांचा वापर करत नाहीत. यामुळे कमी कालावधीत स्नायूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. इस्रोदेखील पहिल्यावहिल्या मानवासहित भारतीय अवकाश वाहनावर काम करीत आहे. ते तीन अवकाशवीरांना सात दिवसांसाठी पृथ्वीच्या नजीकच्या कक्षेत घेऊन जाईल. या अवकाशयानाचे तात्पुरते नाव कक्षीय वाहन असे आहे. या कॅप्सूलची तीन प्रवासी सोबत नेण्याची क्षमता असेल. या पहिल्या मानवसहित मोहिमेमध्ये इस्रोची स्वायत्त आणि तीन टन वजनाची कॅप्सूल दोन अंतराळवीरांसह २४८ मैल (३९९ किमी) उंचीवरून पृथ्वीची सात दिवस प्रदक्षिणा करेल. या पार्श्वभूमीवर आयएसएसची चार देशांच्या अंतराळवीरांची खासगी अंतरीक्ष मोहीम आणि त्यातील शुभांशूंचा सहभाग भारतासाठी अभिमानास्पद बाब आहे.

## वैद्यनाथ विद्यालयाच्या १३ शिक्षकांची पत्रकार परिषद

# शिक्षण उपसंचालक,पोलीस अधिक्षक व जिल्हा अधिका-यांची शिक्षक शिष्टमंडळानी घेतली भेट

**परळी । प्रतिनिधी**

येथील वैद्यनाथ विद्यालयातील तब्बल पंधरा शिक्षक कर्मचाऱ्यांची आर्थिक पिळवणूक व मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने खोट्या माहिती घेऊन तक्रारी करणारा रणजित देशमुख, सादेक इनामदार यांच्या तक्रारीत कसल्याच प्रकारचे तथ्य नसुन केवळ आमच्या कडून पैसे उखळणे,धमकावण्याच्या उद्देशाचा शिक्षकांनी पुरावे दाखवत पत्रकार परिषदेत पर्दाफाश केला असुन लवकरच आम्ही सामुहिक संबंधित खोट्या तक्रार दाखल करणाऱ्या लाचखोरावर अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असुन बीड जिल्हयाचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री ना.अजित पवार साहेब, शिक्षण मंत्री यांची भेट घेणार असल्याचे सांगितले.

दरम्यान मंगळवार दि.८ रोजी शिक्षण उपसंचालक, जिल्हाधिकारी बीड,पोलीस अधिक्षक व शिक्षणाधिकारी बीड यांच्यासह अधिकारी यांची शिक्षकांनी भेट घेऊन चर्चा केली व निवेदन देण्यात आले.या चर्चेत भ्रष्टाचार निर्मूलन समिती नामक असलेल्या समितीचा अध्यक्ष सादेक बाबामिया इनामदार यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद असलेल्या खोट्या तक्रारीचा मुळ दस्तावेज दाखत पर्दाफाश केला असुन प्रसार माध्यमाना खोटी माहिती देऊन शाळेची आम्हा शिक्षकांची बदनामी केली आहे यामुळे आमची बदनामी झाली आहे.यामुळे आमच्या बदनामी बाबत रणजित देशमुख व सादेक इनामदार जबाबदार असल्याने ५ कोटीचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असल्याचे संबंधित शिक्षकांनी पवित्रा घेतला आहे. थोडक्यात आपल्या माहिती देताना सांगावेसे वाटते कि वैद्यनाथ विद्यालयासी कुठलाही संबंध नसताना रणजित देशमुख व सादेक इनामदार यांच्या कडून ठराविक कर्मचाऱ्यानां जाणीव पूर्वक खोटी निवेदने व खोट्या माहितीच्या आधारे वर्तमान पत्रात बातम्या देऊन व शाळेत येऊन धमकावणे व ब्लकमेल करणे जीवे मारण्याची धमकी देऊन मानसिक त्रास दिला जात जात आहे.

मागील अनेक महिन्यांपासून रणजीत देशमुख हा जाणीव पूर्वक शाळेतील कर्मचाऱ्यानां धमकावत आहे. मी माजी अध्यक्षांचा नातू आहे मीच तुमचा संस्थाचालक आहे. मला पैसे द्या नाहीतर तुम्हाला नौकरी वरून काढून टाकीन असे म्हणत धमकावत आहे. सादेक इनामदार या व्यक्तीस हाताशी धरून त्याने विविध कार्यालयामध्ये तक्रार निवेदने दिलेली आहेत. जे की पूर्णतः चुकीची आहे. याच माहितीच्या आधारे त्याने वर्तमान पत्रात बातम्या देऊन शाळेची व शाळेतील कर्मचाऱ्यांची बदनामी केलेली आहे. शाळेमध्ये १५ ते २० वर्ष सेवा केलेल्या शिक्षकांविरुद्ध खोट्या तक्रारी केलेल्या आहेत. त्याने ज्या ज्या कर्मचार्याच्या नावानिशी तक्रार दिलेली आहे ते मागील अनेक वर्षांपासून नियमित वेतन घेत आहेत. त्यामुळे वैद्यनाथ विद्यालयामध्ये सद्यस्थिती मध्ये कोणतीही भरती करण्यात आलेली नाही. कुणाचेही थकीत वेतन काढलेले नाही,ज्या कर्मचाऱ्याबाबत संबंधिताने तक्रार दिलेली आहे त्यांच्यासह इतर कर्मचाऱ्यानां त्यांनी तक्रार देण्या अगोदर संपर्क साधून ब्लकमेल करून पैशाची मागणी केली होती. ज्या लोकांनी त्यांच्या धमकीला बळी पडून काहीतरी चिरीमिरी त्याला व त्याच्या साथीदाराला दिली त्याचे नाव वगळून ज्यांनी चिरीमिरी दिली नाही त्यांची विरोधात तक्रार दिली आहे. ती सुद्धा तथ्य हिन आहे.जसे की, सन २०१७ मध्ये एकूण १७ शिक्षक अतिरिक्त झालेले असताना तक्रार अर्जामध्ये १० शिक्षक कर्मचाऱ्यांच्या नावे तक्रार दिली आहे. तसेच वरील कर्मचाऱ्यांचे समायोजन इतर शाळेमध्ये झाले होते परंतु सदरील कर्मचाऱ्यांना संबंधित शाळेने रुजू न करून घेतल्यामुळे त्यांचे मूळ अस्थापानेवरून वेतन काढण्याचे आदेश दिले. त्यानुसार ज्यांचे समायोजन झाले नाही त्यांचे वैद्यनाथ विद्यालयातून पगार निघत आहे. यावरुन रणजीत देशमुख व सादेक इनामदार यांनी जाणीव पूर्वक काही ठराविक शिक्षकांना. लक्ष केल्याचे सिद्ध होते.सन २०१४ मध्ये पहिल्यांदा शालार्थ प्रणाली शासनाने कार्यान्वयित केली. तेव्हाच या शिक्षकांची नावे शालार्थ प्रणाली मध्ये समाविष्ठ करण्यात आली होती. व तेव्हापासूनच हे शिक्षक कर्मचारी वेतन घेत आहे, त्यामुळे बोगस शालार्थ आयडी काढून लाखोंचे थकीत वेतन काढले हे म्हणणे संपूर्ण खोटे आहे. व तक्रार दराने वैयक्तिक वादातून पूर्वग्रह दुषित होऊन ब्लकमेल करण्याच्या हेतूने ही खोटी तक्रार दिली आहे. ज्या शिक्षकांच्या नियुक्ती दिनांकावर व वैयक्तिक मान्यतेवर तक्रार दराने आक्षेप घेतला आहे. त्यामध्ये तोच जावक क्रमांक असणारे चार शिक्षक कर्मचारी आहेत. परंतु त्यांचे मात्र नाव तक्रार अर्जात घेण्यात आलेले नाही. यावरून तक्रारदाराने जाणीव पूर्वक जातीय द्वेषातून व आर्थिक तडजोडीतूनच ही तक्रार दिल्याचे सिद्ध होते.रणजीत देशमुख व सादेक इनामदार हे सातत्याने ज्या माजी मुख्याध्यापक मोदी यांच्या पत्राचा हवाला



देवून संबंधित शिक्षकाची बोगस व बेकायदा भरती झाल्याचे सांगत आहेत. व जि कागदपत्रे ते दाखवत आहेत त्याबाबत स्पष्ट करण्यात येते की, जानेवारी २०१७ मध्ये संस्थेचे संस्थापक सचिव श्री. भानुदासरावजी देशमुख यानी संस्थेचा ठराव देऊन मोदी यांना मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती दिली होती. मुख्याध्यापक झाल्यावर ज्या शिक्षक कर्मचाऱ्यांवर मोदी यांनी शाळेत हजरच नव्हते त्यांचे कोणतेही दस्तावेज उपलब्ध नाहीत ते कार्यरत नव्हते असे आक्षेप घेतलेले पत्र सादर केले होते. त्या सर्वांचा पगार मुख्याध्यापक म्हणून त्यांनीच पाठविला व त्यांच्या खात्यावर वर्ग केलेला आहे. त्यामुळे सदरचे कर्मचारी कार्यरत होतेच हे सिद्ध होते.मोदी यांनी जो अहवाल दिलेला आहे त्यामागील कारणही तितकेच महत्वपूर्ण आहे. कारण संस्थापक सचिव यांचे नोव्हेंबर २०१७ मध्ये निधन झाल्यानंतर मोदी यांनी शाळेवर व संस्थेवर स्वतः चा कब्जा करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. त्याच अनुषंगाने त्यांनी वरील कर्मचाऱ्यांसह इतर लोकांना अधिकार नसताना खोटी माहिती शिक्षण विभागाला देऊन काही ठराविक शिक्षक कर्मचाऱ्यांना बोलवून धमकी देऊन पैशाची मागणी केली. त्यावेळी ज्या लोकांनी त्याला पैसे दिले त्यांची काहीही तक्रार केली नाही परंतु ज्यांनी पैसे दिले नाही त्यांची बेकायदेशीर रित्या सेवा समाप्ती केली व ज्यांनी पैसे नंतर देतो असे कबुल झाले त्यांच्यावर काहीही कार्यवाही केली नाही.श्री. संजय गुट्टे, अमोल कटारे व इतर शिक्षक कर्मचारी यांची सेवा समाप्ती केल्यानंतर संबंधितांनी मा. शिक्षणाधिकारी श्री.भगवान सोनवणे यांच्याकडे तक्रार अर्ज देऊन सदरील बेकायदेशीर कार्यवाहीची माहिती दिली. मा. शिक्षणाधिकारी साहेबांनी मा. शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार संबंधितांची चौकशी झाली. व मोदी यांनी केलेले आरोप हे खोटे असून त्यांनी केलेली कार्यवाही रद्द करण्यात आली.परंतु मोदी यांचे चीरीमिरीचे लालच कमी न झाल्यामुळे त्यांनी शाळेतील कर्मचाऱ्यांना तक्रारदाराप्रमाणेच ब्लकमेल करणे धमकावणे चालूच ठेवले या सर्व त्रासाला कंटाळून शाळेतील कर्मचार्याने लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयात मोदी विरोधात तक्रार दिली व त्या तक्रारीच्या अनुषंगाने मोदी यांना १५०००० (दीड लाख) रुपयाची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. ज्याची केस आजपर्यंत ही चालू आहे. त्यामुळे वरील कागदपत्रे हे मोदीनी फक्त कर्मचाऱ्यांना ब्लकमेल करण्यासाठी व चिरीमिरी काढण्यासाठी बनविले होते.सदरील केस मध्ये अटक झाल्यानंतरही केवळ वैद्यनाथ शिक्षण संस्थेमध्ये कुणीही मान्यता प्राप्त संचालक नसल्यामुळे व बरेचसे बदल अर्ज प्रलंबित असल्यामुळे लाचखोर मोदी यांचे निलंबन झाले नाही. जामीन मिळाल्यानंतर ते परत शाळेचे मुख्याध्यापक म्हणून रुजू झाले. परंतु त्यांनी नंतर मात्र या कर्मचाऱ्यांच्या विरोधात कुठेही तक्रार केली नाही. सर्वांचे नियमित वेतन काढले. यावरून सदरचे कर्मचारी हे नियमानुसार कार्यरत होते हे सिद्ध होते.मात्र रणजीत देशमुख व सादेक इनामदार २०२४-२०२५ मध्ये मात्र मोदींचे शिष्य म्हणून काम करत आहेत. व परत खोट्यानाट्या तक्रारी देऊन कर्मचाऱ्यानां परत ब्लकमेल करून धमकावून त्यांच्याकडून चिरीमिरी घेण्यासाठी शाळेची व कर्मचाऱ्यांची बदनामी करत आहेत. खोट्या बातम्या देत आहेत. सद्यस्थितीतील शिक्षणाधिकारी श्री. नागनाथ शिंदे यांच्या काळात कोणतीही नवीन भरती करण्यात आलेली नाही व नवीन भरतीनुसार कोणाचेही २ कोटी, ४ कोटी असे थकीत वेतन काढलेले नाही हे संपूर्ण भंपक बाजी आहे. लवकरच आम्ही सर्व कर्मचारी या दोघांविरुद्ध अब्रु नुकसानीचा ५ कोटीचा दावा देणार आहोत.विशेष बाब म्हणजे रणजीत देशमुख व सादेक इनामदार आमच्या शाळेमध्ये बेकायदेशीर रित्या कुणाची तरी नियुक्ती करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ऐकीव आहे. तो सादेक इनामदार याचा नातेवाईक आहे त्याच्याकडूनही या दोघांनी काहीतरी मोठी रक्कम घेत्लायचे समजले. सदरचे बेकायदेशीर काम करण्यासाठीच तो दबाव टाकण्यासाठी अशा खोट्या बातम्या देत आहे. कारण वरी नमूद केल्याप्रमाणे नोव्हेंबर २०१७ नंतर मान्यताप्राप्त कार्यकारणी अस्तित्वात नसल्यामुळे लाचखोर मोदी याला निलंबित करता आले नाही. त्याच प्रमाणे वैद्यनाथ विद्यालयामध्ये आज ही अधिकृत

नविन कार्यकारणी कार्यरत नसल्यामुळे तसेच चएझ्ड रलीं मधील तरतूद नुसार खाजगी संस्थेमध्ये नवीन नियुक्ती देण्याचे संपूर्ण अधिकार फक्त नि फक्त खाजगी व्यवस्थापनालाच असल्यामुळे सादेक इनामदार यांच्या नातेवाईकाचे बेकायदेशीर नियुक्तीचे काम होत नसल्यामुळे हे दोघे अशा प्रकारची खोटी माहिती देवून,खोट्या बातम्या देवून शाळेतील कर्मचाऱ्यांवर व शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयावर दबाव टाकत आहेत. परंतु यांच्या खोट्या बोगस तक्रारी आहेत असे पत्रकार परिषदेत शिक्षकांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेत संजय सोपान गुट्टे (स.शि.),देशमुख प्रतिभा प्रसादराव (स.शि.),लोखंडे राणी तुकाराम (स.शि.),कटारे अमोल बालासाहेब (स.शि.),भोसले वैशाली विठ्ठलराव (स.शि),देशमुख गोविंद गुलाबराव (स.शि.), आरसुळे ज्योती बालकृष्ण (स.शि.), सातपुते विष्णू लिंबाजी (लिपीक),काळमळी जगन्नाथ वैजनाथ (लिपीक), रोहित प्रमोद काळे (लिपीक),देशमुख शारदा गुलाबराव (स.शि.), शर्मा पुनम दिपक (स.शि.),अंजली अशोक कुटे (स.शि.), बाबासाहेब संतराम किरवले (स.शि.)शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाच्या खंडामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करा-आ.क्षीरसागर

**बीड (प्रतिनिधी):** जुन आणि जुलै महिन्यात म्हणजेच ऐन पावसाळ्यातच पाऊस अचानक बंद झाल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केलेल्या पिकांचे पूर्णतः नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांवर दुबार पेरणीचे संकट येऊन ठेपले आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे.



बीड विधानसभा क्षेत्रातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यात आणि एकूण बीड जिल्ह्यातच पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारली. त्यामुळे शेतात पेरणी केलेल्या पिंकाचे संपूर्ण नुकसान झाले आहे. आणि शेतकर्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ आली आहे. सोबतच सातत्याने विद्युत पुरवठाही शेतकऱ्यांना मिळत नसल्याने शेतीपिकांना दोन्ही बाजूंनी अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानींबाबत महसूल आणि कृषी विभागाकडून पीकनिहाय पंचनामे करून शेतकरी बांधवांना अर्थसहाय्य आणि दुबार पेरणीसाठी सहकार्य करावे. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या हस्ते काझी मुजीब यांचा सत्कार

**बीड (प्रतिनिधी):** महाराष्ट्र राज्य काझी सेवा संघाच्यावतीने राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या हस्ते व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथील नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक काझी मुजीब यांचा हृदयसत्कार करण्यात आला. याप्रसंगी काझी सेवा संघाचे राज्याध्यक्ष काझी शफी, कार्याध्यक्ष काझी अबूतालेब, केज नगरपंचायतच्या अध्यक्षा उज्वलाताई वाघमारे, गटनेते हारूनभाई इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते.

बीड शहरातील नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक काझी मुजीब हे शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. आपल्या



कार्यकाळात त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले असून पवित्र ज्ञानदानाच्या कार्याबरोबरच विविध सामाजोपयोगी उपक्रम राबविले आहेत. या सेवापुर्तीबद्दल महाराष्ट्र राज्य काझी सेवा संघाच्यावतीने राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांच्या हस्ते आणि उपस्थित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत काझी सेवा संघाच्या कार्यालयात काझी मुजीब यांचा हृदयसत्कार करण्यात आला. याप्रसंगी काझी सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष काझी मोईनोद्दीन, काझी शाकेरभाई, काझी शौकत, काझी बाबा, पैठणचे काझी फजलुल्लाह, पत्रकार जावेद पाशा, अफरोज कादरी, काझी बहाउद्दीन, काझी फैजान, बाबा करीम पटेल यांच्यासह काझी सेवा संघाचे पदाधिकारी व सदस्य आवर्जून उपस्थित होते.

# अपहरण झालेल्या सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि गुंडाकडून बेदम मारहाण!

## मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी;जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू

**बीड । प्रतिनिधी**

बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी राजाराम सिरसट यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत अधिक माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दिनांक ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतःचा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपये देऊ नका असे सांगितले. त्यामुळे मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान लाठ्या-काठ्या, कु-हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी मुकादमाने त्याच्या जवळ असलेल्या रिव्हॉल्वरचा धाक दाखवून पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली असता पोलीस खात्यातील कैशल्याचा वापर करून



राजाराम सिरसट यांनी शिताफिने मुकादमा जवळील रिव्हॉल्वरचा ताबा घेतला. परंतु सदर रिव्हॉल्वर मध्ये बुलेट नाहीत हे मुकादम आणि त्याच्या साथीदारांना माहित असल्यामुळे आपल्याला काही धोका नाही हे सर्वांना ज्ञात होते. त्यामुळे सर्वांनी असुरी हसत पुन्हा जबर मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी झाले. या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून माजलगाव तालुक्यातील ढोरगाव आणि लवूळ शिवारातील घनदाट असलेल्या जंगलात घेऊन जाऊन पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये राजाराम सिरसट यांच्या घशाला कोरड पडल्यामुळे त्यांनी मुकादम आणि मारहाण करणाऱ्यांकडे मला मारू नका, मी मरेन, मला पाणी द्या अशी विनंती करून पिण्यासाठी पाणी मागितले असता या गुंडांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली. यावर हे लोक थांबले नाहीत यांनी त्यांच्या कानात नको ती कृती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आपल्या साहेबासोबत अमानुष कृत्य करत आहेत आणि बेदम मारहाण करत आहेत हे पाहून घाबरलेला शेतगडी त्या ठिकाणाहून पळून गेले व त्यांनी राजाराम सिरसट यांच्या मुलाला फोन करून मुकादम आणि त्याचे साथीदार जबर मारहाण करत आहेत. तुम्ही ताबडतोब या असे फोन द्वारे सांगितले. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याचे समजताच राजाराम सिरसट यांचा मुलगा विजयकुमार सिरसट यांनी वडीलांना फोनवरून संपर्क साधला असता मुकादम व त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांना कोणाचा फोन आहे असे म्हणत फोन उचलण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजाराम सिरसट यांनी आपल्या मुलाला फोनवरून मला लऊळ गावातील सैलानी बाबा परिसरात मुकादम आणि त्याचे काही साथीदार मारहाण करत आहेत ताबडतोब ये असं निरोप दिला. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याने विजयकुमार सिरसट मित्रांना घेऊन वडिलांना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा आणि त्याचे मित्र येत असल्याचे पाहून मुकादम व त्याच्या गुंडांनी गंभीर जखमी झालेल्या राजाराम सिरसट यांना पुन्हा गाडीवर बसवून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्यावर

चिखल असल्याने मोटारसायकल चिखलात स्लिप झाली व मोटारसायकलवरील तिघे खाली पडले. त्यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा व त्याचे मित्र घटनास्थळी येताच मारहाण करणारे गुंड पळून गेले. दरम्यान या वेळी मारहाण करणाऱ्या मुकादमाला विजयकुमार सिरसट यांच्या मित्रांनी पकडून माजलगाव पोलीस ठाण्यात आणले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी मारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीत राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालय उपचार सुरू आहेत.

किरकोळ पैशासाठी मुकादम आणि त्याच्या साथीदारांकडून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना अमानुष आणि गंभीर मारहाण होते हे बाब अतिशय गंभीर आणि अमानवी आहे. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

# लाईनस्टाफ संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंची घेतली भेट

## महावितरण वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लाईनस्टाफवर अन्याय करू नये

**बीड । प्रतिनिधी**

बीड महावितरण वरिष्ठ अधिकाऱ्यां कडून लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक त्रास दिला जात असून, त्यांच्या अडचणी व मागण्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून त्यांची हेळसांड केली जात आहे. अशी तक्रार क्रांतिकारी लाईनस्टाफ सेनेच्या शिष्टमंडळाने आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या कडे लेखी निवेदना द्वारे केली आहे.

महावितरण बीड विभागीय कार्यालय अंतर्गत महिला तंत्रज्ञ कर्मचारी सौ. अस्मिता प्रकाश रायमल व त्यांचे पती प्रकाश रायमल कार्यरत आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांची पती प्रकाश रायमल यांच्याशी चालू असलेल्या कुरबुरी मुळे पत्नी सौ. अस्मिता रायमल यांची अन्यकारक बदली केल्याने लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांनी नाराज व्यक्त करून सदरील बदली रद्द करण्याची विनंती केली आहे. नैराश्याच्यातुन सदरील महिला कर्मचारी यांनी ११ जुलैच्या सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पती मुलांना सोडून निघून गेल्या आहेत. माझे काही बरे वाईट झाले तर यास सर्वस्वी जबाबदारी बदली प्रस्ताव पाठवणाऱ्या अभियंत्याची असेल, असा मेसेज टाकला आहे. ११ जुलै रोजी रात्री ग्रामीण पोलीस स्टेशनला या प्रकरणाची माहिती दिली आहे.प्रकाराचे गांभीर्याने चिंतीत होवून क्रांतिकारी लाईन स्टाफ सेनेचे पदाधिकारी व सभासद यांनी भेट घेतली शेख अमीर मदनी,गजानन साळुंके, अश्वलींग बरे, गोकुळ गायकवाड, रजनीकांत तागड, गणेश कागदे,प्रवीण शिंदे, दत्ता माटे,रवी देशमुख,युवराज जोगदंड,लहु वाघमारे,सुनिल लांडगे, रामदास गायके यांच्या नेतृत्वात लाईनस्टाफ कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. कार्यकारी अभियंता श्री डोंगरे यांच्याशी राजेंद्र मस्के यांनी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन काम करावे. आकसा पोटी कोणावरही अन्याय करु नका. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसी चर्चा करून मार्ग काढावा अशी सूचना केली आहे.



## आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त

# शालेय क्रीडा व सांस्कृतिक सप्ताहाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी नाथ शिक्षण संस्थे अंतर्गत शालेय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

नाथ शिक्षण संस्थेच्या सचिव सौ.राजश्रीताई धनंजय मुंडे व सहसचिव मा.प्रदीप खाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १५/०७/ २०२५ ते २२/०७/२०२५ पर्यंत नाथ शिक्षण संस्थेच्या अंतर्गत असलेल्या विद्यालय व महाविद्यालयातील सर्व प्राचार्य,मुख्याध्यापक, क्रीडा व सांस्कृतिक प्रमुख यांच्या बैठकीत प्रथमोपचार मार्गदर्शन,पोलीस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन,शालेय अंतर्गत क्रीडा स्पर्धा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून




वाढदिवस सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती नाथ शिक्षण संस्थेचे

समन्वयक प्राचार्य अतुल दुबे, प्राचार्य व्हि.एन.शिंदे , आर.बी.गुट्टे, मुख्याध्यापक श्री. कदरकर, श्री.साखरे, श्रीमती वानखेडे मॅडम, श्री.राठोड, श्री.आघाव, श्रीमती धस मॅडम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिले आहे.

# आदर्श विद्यार्थ्याचा आदर्श वाढदिवस वृक्षारोपण व शालेय साहित्य वाटपाने साजरा

### कर्तृत्वाचा नवा अध्याय–तेजस्वी विचारांचा वारसा घेऊन देवदत्त अण्णासाहेब साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रेरणादायी उत्सव!

**आष्टी । प्रतिनिधी**

शिस्त,विचारशीलता आणि तेजाचा संगम असलेल्या देवदत्त अण्णासाहेब साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यात सामाजिक,शैक्षणिक आणि सांस्कृतिक वर्तुळात आनंदाचा व प्रेरणादायी माहोल अनुभवास आला.पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय,आष्टी येथे बारावी (सायन्स)चे शिक्षण घेत असलेले देवदत्त हे केवळ अभ्यासातच नव्हे, तर नम्रता आणि सामाजिक बांधिलकीतही पुढे आहेत. महाविद्यालयीन परिसरात ते आदर्श विद्यार्थ्याचे जिवंत उदाहरण मानले जातात. वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ कवी व प्रबोधनकार महादेव लांडगे यांनी त्यांना शालेय साहित्य भेट देत सन्मानित केले,तर सामाजिक कार्यकर्ते अशोक माने यांनी पुष्पमालाने



गौरव केला.घरच्या परिसरात वडीलांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरणप्रेमी संदेश दिला गेला.कृष्णा हॉटेल येथे पुंडीचे उपसरपंच बाळासाहेब थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.कार्यक्रमास पंचायत समितीचे बागडे साहेब, उद्योजक चांगुणे,लक्ष्मण कोठुळे यांच्यासह प्राचार्य सुरेश बोडखे, उपप्राचार्य भवर,प्रा.ब्रह्मदेव भोसले, प्रा.राहुल सोनवणे,प्रा.भोज,प्रा. निखिल सावंत,प्रा.साळवे,प्रा.फुले व इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी शालेय पुस्तके व प्रेरणादायी भेटवस्तू देत शुभेच्छा दिल्या गेल्या.सोशल मीडियावर दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवर,पत्रकार, शिक्षक,मार्गदर्शक आणि मित्रपरिवाराने शुभेच्छांचा वर्षाव केला.लोकशाही पत्रकार संघ,बीड जिल्हा उपाध्यक्ष आणि निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण नियंत्रण मंडळ महाराष्ट्र प्रमुख मा.अण्णासाहेब साबळे यांनी सुपुत्र देवदत्त यांना शुभाशीर्वाद देताना भावनिक उद्गार व्यक्त केलेशिस्त,प्रामाणिकपणा आणि लोकशाही मूल्यांची प्रेरणा घेऊन देवदत्त समाजासाठी तेजस्वी दीप बनेल,असा विश्वास आहे.विचारशील मन आणि सामाजिक जाणिवेसह पुढे वाटचाल करणारा तो एक आदर्श नागरिक ठरावा,हीच वडिलकी भावना.

# प्रामाणिकपणा आणि कार्यतत्परता गुणांमुळे सुनील देशपांडे आयकान म्हणून ओळखले जातील–सोनवणे

**केज । प्रतिनिधी**

प्रामाणिकपणा व कार्यतत्परता या गुणांमुळे सुनील देशपांडे हे आयकान म्हणून ओळखले जातील असे गौरवोद्गार राष्ट्रीय काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष श्री.राहुल सोनवणे यांनी काढले ते

सुनील आबासाहेब देशपांडे वरिष्ठ लिपिक सरस्वती कन्या प्रशाला केज यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलत होते.केज येथील स्वामी समर्थ मठामध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी श्री.भाऊसाहेब देशपांडे श्रीराम जोशी,गिरीश देशपांडे,अंकुशराव इंगळे,सौ.सायली पत्की प्रशांत



देशपांडे,तसेच मंगळवेढा येथील श्री. नलावडे यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या.याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना सुनील देशपांडे यांनी सांगितले की,माझ्या जीवनात देशपांडे परिवाराचे योगदान खुप असुन स्व.शिवाजीराव काका पाटील,खा.सौ. रजनीताई पाटील,श्री. अशोक दादा पाटील यांनी घडवले आहे. आपण या परिवारास आपण कायम समर्पीत आहोत त्यामुळे कधीही कामात तत्पर आहे असे त्यांनी सांगितले.यावेळी व्यासपीठावर नवनाथ थोटे,अप्पासाहेब ईखे, अंकुशराव इंगळे,गिरीश देशपांडे,सौ.रोहिणी गजेंद्रगडकर,श्री.विजय प्रकाशठोंबरे,नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, प्रविण शेप,बाबाराजे देशमुख आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन सुमीत देशपांडे यांनी केले.यानंतर सुनील देशपांडे यांचा सत्कार मित्रमंडळी व नातेवाईकांनी केला. यावेळी मित्र,सहकारी कर्मचारी,नातेवाईक व देशपांडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गायराण जमिनीच्या हक्कासाठी मानवी हक्क मोर्चासाठी मोठया संख्येने यावे–विष्णू मुजमुले

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगांव येथील उपविभागीय कार्यालयावर मानवी हक्क अभियानच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे .दि .१४ जुलै २०२५ रोजी गायरान जमिनी नावे करा आनुसुचित जातीचे आरक्षण वर्गीकरण अ . ब . क .ड .करा आर्टी बार्टीला भरीव निधी उपल्बध करा उसतोड कामगार यांना विम्याचे सरंक्षण द्यावे घरकुल साठी आसणारी रक्कम ५ लाख रू करावी निराधार महिलांना ६०००रू अर्थ साहाय्यची तरतुद करावी समाजिक विकासाची आसणारे अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ महात्मफुले विकास महामंडळ वसंतराव नाईक महामंडळ यांना ठोस आसे भरिव अर्थिक तरतुद करण्यात यावी विद्यार्थ्यांना शिष्यवृती देन्यात यावी आशा मागण्यासाठी माजलगाव उपविभागीय कार्यालयावर १४ जुलै रोजी मानवी हक्क आभियानच्या वतीने मोर्चा काढण्यात येणार आहे तरी या मोर्चा मध्ये सहभागी व्हावे आसे आव्हान मानवी हक्क अभियान वडवणी तालूकाध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले यांनी केले आहे.



# खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची एसईबीसी प्रमाणपत्र व्हॅलिडीटी प्रक्रिया तहसील कार्यालयात सुरू करून गैरसोय दूर करावी

## जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

एसईबीसी प्रमाणपत्र वैधता प्रक्रिया म्हणजे सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्याची प्रक्रिया आहे. यासाठी मूळ जात प्रमाणपत्रासोबत काही आवश्यक कागदपत्रे जोडून, संबंधित जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यासाठी समितीकडे अर्ज करावा लागतो. ही प्रक्रिया बीड जिल्ह्यातील समाज कल्याण कार्यालयात करण्यात येत आहे. एसईबीसी (डएइउ) प्रमाणपत्र काढण्यासाठी विद्यार्थी समाज कल्याण कार्यालय बीड येथे मोठ्या संख्येने गर्दी करत आहेत. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सदरील प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. या प्रमाणपत्राची व्हॅलिडीटी जिल्ह्याच्या ठिकाणाऐवजी प्रत्येक तालुक्यात तहसील कार्यालयात सुरू करण्यात यावी व विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय दूर करावी. अन्यथा या प्रश्नी लवकरच लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, खुल्या प्रवर्गात विशेषतः मराठा समाजातील विद्यार्थ्यांना हे प्रमाणपत्र उच्च शिक्षणासाठी तात्काळ हवे आहे. त्यामुळे बीड येथील समाज कल्याण कार्यालयात प्रमाणपत्र काढण्यासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने खेड्यापाड्यातून येत आहेत.

मराठा समाज व इतर समाजातील खुल्या प्रवर्गात एसईबीसी (डएइउ) आरक्षण मिळाल्यानंतर, विद्यार्थ्यांना या आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र आवश्यक आहे. या प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांना बीड येथील समाज कल्याण कार्यालयात व्हॅलिडीटी करावी लागत आहे. समाज कल्याण




कार्यालयात मोठी गर्दी होत आहे. कार्यालयात अपुरी व्यवस्था आणि कर्मचाऱ्यांची संख्या यामुळे विद्यार्थ्यांना सदरील प्रक्रिया पार पाडण्यासाठी अडचणी येत आहेत. तसेच अनेक विद्यार्थ्यांना व्हॅलिडीटी करण्यासाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. तर काही ठिकाणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जास्त वेळ वाट पाहावी लागत आहे. विद्यार्थी व पालकांना सदरील कामासाठी समाज कल्याण कार्यालय बीड येथे अनेक चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक फटका मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्येवर लवकरच तोडगा काढण्याची गरज आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना लवकरात लवकर तहसील कार्यालयात व्हॅलिडीटी करून प्रमाणपत्र मिळू शकेल. प्रशासनाने विद्यार्थ्यांची व पालकाची अडचण लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्यातील तहसील कार्यालयात व्हॅलिडीटी ची प्रक्रिया राबवून एसीबीसी चे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. अन्यथा या प्रश्नी लवकरच लोकशाही मार्गाने आंदोलन करणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकारद्वारे जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी कळविले आहे.

**समाज कल्याण कार्यालयात गैरसोय?**

एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळतो. त्यामुळे, हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आहे. सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी देखील एसईबीसी प्रमाणपत्र आवश्यक आहे. नोकरीच्या संधींमध्ये एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे, विद्यार्थी हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. त्यामुळे बीड येथील समाज कल्याण कार्यालयात मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची गर्दी होत असून कार्यालयात गैरसोय होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077